**प्रिया सचिन पाटील वगैरे**

**विरूध्द**

**सचिन वसंतराव पाटील वगैरे**

**<u>आदेश निशाणी क्रमांक ५ वर</u>**

**(दिनांक २०/०५/२०२६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचे संरक्षणचे कलम २३ अन्वये विविध आदेश मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार हिचे कथनानुसार, तिचा विवाह सामनेवाला क्रमांक १ सोबत दिनांक २६/०५/२०१९ रोजी हिंदु धर्मशास्त्र व जातीरिवाजानुसार झालेले असुन या नातेसंबंधातुन अर्जदार क्रमांक २ जन्मास आलेला आहे. आज देखील हे नातेसंबंध कायम आहेत. सामनेवाला हे अर्जदार हिचे सासरकडील नातेवाईक आहेत. तिला सुरुवातीचे चार ते पाच महिने चांगले नांदविले. त्यानंतर सामनेवाला क्रमांक १ अर्जदार हिस शारीरीक व मानसिक त्रास देऊ लागला. सामनेवाले हे अर्जदार हिस माहेरकडुन पंधरा लाख रुपये घेऊन येण्याची मागणी करीत होते. तिला वाईट बोलुन अपमानित करीत होते. सामनेवाला क्रमांक २ ते ४ हे संगनमत करुन सामनेवाला क्रमांक १ याची कानभरणी करीत होते. अर्जदार क्रमांक २ हिचा जन्म झाल्यानंतर सामनेवाले यांना कळविले असता, ते मुलगी झाल्यामुळे नाराज झाले. तिला सासरी घेऊन जाण्यास सामनेवाला क्रमांक १ टाळाटाळ करीत होता.

३. अर्जदार पुढे कथन करते की, सामनेवाला क्रमांक १ हा डिप्लोमा इन कॉम्प्युटर इंजिनियर नसल्याचे माहिती झाले. त्याने लग्नाच्या वेळेस खोटे बोलुन त्याची स्वतःची चिराई इन्फोटेक कंपनी असल्याचे सांगितले होते. शैक्षणिक कागदपत्रांची सामनेवाला क्रमांक १ यांच्याकडे मागणी केली असता, त्याने उध्दटपणे उत्तरे दिली. सामनेवाला क्रमांक १ नांदण्यास नेत नसल्यामुळे तिने विधीज्ञामार्फत दिनांक ०८/०३/२०२३ रोजी नोटीस पाठविली होती. त्यास देखील त्याने खोटे उत्तर पाठविले आहे. बैठक बसवुन अर्जदार व सामनेवाला यांना समजावुन अर्जदार क्रमांक १ हिस नांदण्यास पाठविले होते. परंतु, तरी देखील सर्व सामनेवाले यांनी तिचा शारीरीक व मानसिक छळ केला. भविष्याचा विचार करुन ती सर्व त्रास सहन करुन नांदत होती. सामनेवाला क्रमांक २ ते ४ यांनी अर्जदार क्रमांक १ हिच्या आई वडीलांनी दिलेले लग्नामधील स्त्रीधन जबरदस्तीने काढुन त्यांच्या ताब्यात ठेवले आहे. ती नाईलाजाने अर्जदार

क्रमांक २ सोबत तिच्या माहेरी राहत आहे. तिला स्वतंत्र उत्पन्नाचे साधन नाही. याउलट, सामनेवाला क्रमांक १ नोकरीवर असुन व व्यवसायाद्वारे तीन ते पाच लाख रुपये कमवितो. त्याच्या मुळ गावी स्थावर व जंगम मिळकत आहे. सामनेवाला क्रमांक १ याची जबाबदारी असतांना देखील त्याने पार पाडलेली नाही. सबब, अर्जदार हिने अंतरीम खावटीचा आदेश होण्यासाठी सदरचा अर्ज दाखल केला आहे.

४. सामनेवाला यांनी निशाणी क्रमांक १६ वर सदर अर्जास म्हणणे दाखल करुन अर्जदारांशी असलेले नातेसंबंध मान्य करुन अर्जदाराने कथन केलेल्या ईतर सर्व कथने त्यांनी नाकारली आहेत. सामनेवाला यांच्या कथनानुसार, सामनेवाला क्रमांक २ ते ४ हे एका छताखाली राहत नव्हते. त्यामुळे Miss joinder of party ची बाधा लागु होत आहे. त्यामुळे अर्जदार हिचा अर्ज कायदेशिर नाही. अर्जदार हिच्या घरच्या लोकांनी सामनेवाला क्रमांक १ याची शैक्षणिक पात्रतेची खात्री केली व त्यानुसारच लग्न झाले आहे. अर्जदार ही हिच्या आईवडीलांनी सामनेवाला क्रमांक १ कमी शिकलेला असल्यामुळे त्याच्याकडे पाठविण्यास नकार दिला. त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला असता, तरीदेखील त्याचा काही उपयोग झाला नाही. अर्जदार ही घरातील कुठलेही कामकाज न करता आजारपणा खोटा बहाण करीत होती. ती दिवसभर आई वडील व भाऊ यांच्याशी फोनवर बोलत होती. तिला समजावण्याचा प्रयत्न केला असता ती माहेरी निघुन जाण्याची धमकी देत होती. अर्जदार ही स्वःमर्जीने तिच्या माहेरी राहत आहे. अर्जदार हिच्या वडीलांनी स्पष्ट शब्दात नकार देऊन फारकतीची मागणी केली होती.

५. सामनेवाला क्रमांक १ हा पुर्वी छोटासा व्यापार करीत होता. परंतु, कोरोना काळ व टेंन्शनमुळे त्याचा व्यापारात जम बसत नाही. अर्जदार ही उच्च शिक्षीत असुन तिने ब्युटी पार्लरचा कोर्स देखील केलेला आहे. ती महिना पन्नास ते साठ हजार रुपये सहज कमवु शकते. तसेच ती शहादा येथे ब्युटी पार्लरचा कोर्स चालवुन दरमहा तीस हजार रुपये उत्पन्न कमविते. त्यामुळे अर्ज फेटाळुन लावण्याची विनंती केली आहे.

६. दोन्ही पक्षकारांच्या वकीलांचे यूक्तीवाद ऐकला. अर्जदार हिच्या विधीज्ञांच्या युक्तीवादानुसार अर्जदार ही नाईलाजाने सामनेवाला क्रमांक १ याच्यापासुन स्वतंत्र राहत आहे. तेव्हापासुन सामनेवाला क्रमांक १ याने तिची विचारपुस केलेली नाही. तिला कोणतेही उत्पन्नाचे साधन नाही. याउल, सामनेवाला क्रमांक १ याने लग्नाच्या वेळेस तो कमी शैक्षणिक पात्रतेचा असुन देखील उच्च पात्रता दाखवुन अर्जदार व तिच्या कुटुंबीयाची फसवणुक केलेली आहे.

सामनेवाला याने अर्जदार हिचा वेळोवेळी छळ केलेला आहे. ती असहाय्यपणे माहेरी राहत आहे. सामनेवाला क्रमांक १ हा अर्जदार क्रमांक १ हिचा पती व अर्जदार क्रमांक २ हिचा पिता आहे. त्यामुळे त्याची त्यांना सांभाळण्याची नैतिक व कायदेशिर जबाबदारी आहे. म्हणुन सदरचा अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. याउलट, सामनेवाला यांच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जदार ही स्वतःहुन सामनेवाला क्रमांक १ याच्यापासुन विभक्त राहत आहे. अर्जदार म्हणत असल्याप्रमाणे सामनेवाला यांनी तिच्या विरोधात कोणताही कौटुंबिक हिंसाचार केलेला नाही. सामनेवाला क्रमांक १ हा आजदेखील अर्जदार क्रमांक १ हिला नांदविण्यास तयार आहे. अर्जदार ही अभियांत्रीकी शाखेमध्ये सुवर्णपदक विजेता आहे. त्यामुळे तिला चांगली नोकरी लागु शकते. याउलट, सामनेवाला क्रमांक १ यांच्याकडे कोणतेचे उत्पन्नाचे साधन नाही. म्हणुन सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे.

७. अभिलेख पाहीला व पक्षकाराने दाखल केलेल्या दस्तऐवजांची पाहणी केली. अर्जदार हिने तिचे संपत्ती व दायित्तवाचे शपथपत्र निशाणी क्रमांक १८ वर तर सामनेवाला क्रमांक १ याने त्याचे संपत्ती व दायित्वाचे शपथपत्र निशाणी क्रमांक २० वर दाखल केले आहे. यानुषंगाने खालील मुद्दे उपस्थीत होत आहेत.

| अ.क्रं | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे सिध्द करते काय की, सामनेवाला याने तिच्याविरुध्द घरगुती हिंसाचार केला आहे काय ? | होकारार्थी |
| २ | अर्जदार हे सिध्द करते काय की, ती पोटगी मिळविण्यास पात्र आहे काय ? | अंशतः होकारार्थी |
| ३ | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्रमांक १ करीता

८. अर्जाचे अवलोकन केले असता, अर्जदार व सामनेवाला क्रमांक १ हे पती–पत्नी असल्याचे उभय पक्षांना मान्य आहे. अर्जदार हिला कौटुंबिक हिसांचारापासुन महिलांचे संरक्षण कायदा, २००५ या अंतर्गत अंतरीम आदेश मिळवण्याकरीता तिने सामनेवाला हा तिच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केला हे सिध्द करावे लागते. कायदा २००५ यामध्ये

कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या विस्तृतपणे नमुद करण्यात आलेली आहे. अर्जदार हिने सामनेवाला यांनी तिच्याविरुध्द केलेला कौटुंबिक हिंसाचार विस्तृतपणे शपथेवर नमुद केलेला आहे. त्यामुळे प्रथमदर्शनी सामनेवाला याने अर्जदार हिच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केल्याचे दिसुन येत आहे. म्हणुन मी मुद्दा क्रमांक १ चे उत्तर होकारार्थी देण्यात येते.

**मुद्दा क्रमांक २ करीता**

९. अर्जदार हिच्या कथनाप्रमाणे ती नाईलाजाने स्वतंत्र राहत आहे. तसेच तिला कोणतेही उपजिवीकेचे साधन नाही. याउलट, सामनेवाला क्रमांक १ याला विविध उत्पन्नाच्या साधनामधुन वार्षिक तीन ते पाच लाख रुपये उत्पन्न मिळते. तसेच सामनेवाला क्रमांक १ याच्या मुळ गावी स्थावर व जंगम मालमत्ता आहे. परंतु, अर्जदार हिने त्याबाबतचे दस्तऐवज दिले नसल्याचे दिसुन येत आहे. सामनेवाला क्रमांक १ याने त्याच्या संपत्ती व दायित्वाच्या शपथपत्रामध्ये दरमहा ९,०००/– कमवित असल्याचे स्पष्टपणे नमुद केले आहे. मुद्दा क्रमांक १ च्या अनुषंगाने पटलावर ही बाब निर्विवादीत आहे की, अर्जदार ही आजरोजी तिच्या माहेरी राहत आहे. सामनेवाला क्रमांक १ याच्या विधीज्ञांनी युक्तीवाद केला की, अर्जदार ही उच्चशिक्षीत आहे. त्यामुळे ती नोकरी करुन स्वतःचा व अर्जदार क्रमांक २ चा सहज सांभाळ करु शकते. याउलट, सामनेवाला क्रमांक १ याचे उत्पन्न तुटपुंजे आहे. तसेच अर्जदार क्रमांक २ हिचे दहावी पर्यतचे शिक्षण मोफत असल्याचे नमुद केले आहे.

१०. सामनेवाला क्रमांक १ हा अर्जदार क्रमांक १ चा पती व अर्जदार क्रमांक २ चा पिता आहे. त्यामुळे तो अर्जदार यांचा सांभाळ करण्यास बांधील आहे. सामनेवाला क्रमांक १ याने अर्जदार क्रमांक १ शी दिनांक १३/०४/२०२५ पासुन विभक्त राहत असल्याचे कथन केले आहे. तेव्हापासुन सामनेवाला क्रमांक १ याने त्यांच्यापालनपोषणाची काय जबाबदारी पार पाडली याबाबत कोणतेच दस्तऐवज दाखल केलेले नाहीत. याचाच अर्थ त्याने त्याकडे दुर्लक्ष करुन अर्जदार यांच्याविरुध्द कौटुंबिक हिंसाचार केलेला आहे. अर्जदार क्रमांक १ ही उच्चशिक्षीत असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे तिच्या जिवनशैलीचा व राहणीमानाचा तसेच सामनेवाला क्रमांक १ याच्या उत्पन्नाचा विचार केला असता, त्यास अर्जदार क्रमांक १ हिला पोटगी म्हणुन दरमहा रुपये २,०००/– व अर्जदार क्रमांक २ हिला दरमहा रुपये १,०००/– अंतरीम पोटगी देण्याकरीता आदेशित करणे योग्य व न्यायोचित होईल. अर्जदार हिने अंतरीत अर्जामध्ये स्त्रीधन परत करण्याची व घरभाडे तसेच नुकसान भरपाई बाबत आदेश पारीत करण्याची मागणी केली आहे. परंतु, सदर मागण्या पटलावर पुरावा आल्यानंतर मुळ अर्ज

निकाली काढत असतांना विचारात घेतल्या जातील. म्हणुन मी मुद्दा क्रमांक ३ चे उत्तर अंशतः होकारार्थी देऊन मुद्दा क्रमांक ४ करीता मी खालील आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१. अर्ज हा अंशतः मंजूर करण्यात येतो.

२. सामनेवाला याला असे आदेशित करण्यात येत आहे की, त्याने अर्जदार क्रमांक १ हिला रक्कम रुपये २,०००/– दरमहा तसेच अर्जदार क्रमांक २ हिला रक्कम रुपये १,०००/– दरमहा अशी एकुण रक्कम रुपये ३,०००/– अंतरीम पोटगी म्हणुन अर्ज दाखल झाल्यापासुन मुळ अर्ज निकाली लागेपावेतो द्यावेत.

३. सदर आदेशाची पत्र दोन्ही पक्षकारांना विना मुल्य देण्यात यावी.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

सत्यमेव जयते

Digitally signed by AVINASH DASHRATH GORE
Date: 2026.05.20 16:20:50 +0530

शहादा. **( ए. डी. गोरे )**

दिनांक– २०/०५/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,

न्यायालय क्र.०२,शहादा.

<u>दाखला</u>

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकुर हा मुळ आदेशाप्रमाणेच आहे.

लघुलेखकाचे नाव – एन.आर.पाटील

न्यायालयाचे नाव – सह दिवाणी न्यायालय क.स्तर, कोर्ट नं. १, शहादा, जि. नंदुरबार

आदेश जाहिर केलेची तारीख – २०/०५/२०२६

ओदशावर न्यायाधीशांची स्वाक्षरी केल्याची तारीख – २०/०५/२०२६

आदेश अपलोड केल्याची तारीख – २०/०५/२०२६